लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोळे

सांज दैनिक : मंगळवार - १५ ऑगस्ट २०२३

वर्ष - ३७ वे

अंक - १३५

पाने - ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

epaper.dainikbhukamp.com



लातूर - तिरुपती

श्री. बालाजी दर्शनासहित

A/C SLEEPER | AIR SUSPENSION

ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक

ऑगस्ट महिन्याच्या तारखा

◂ दर मंगळवारी ▸

1 8 22 29

दुपारी २.०० वा.

अधिक माहितीसाठी संपर्क

88888 50441

88888 45404

विश्व ट्रॅव्हल्स लातूर.


# संपादकीय......

## आमदार जबाबदारी घेतील का?

भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेल्या सैनिकाची पत्नी आणि आठ वर्षाचा मुलगा काल लातूरच्या छत्रपती चौकात एस. टी. ने धडकल्याने झालेल्या अपघातात अक्षरशः चिरडून ठार झाले. त्यावेळचे तेथील चित्र पाहिले तर पाहणाऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आल्याशिवाय राहत नाही. ते दृश्य पाहणारा क्षणभर तरी रस्त्यावर अस्ताव्यस्त पडलेल्यात आपली पत्नी, मुलगा पाहिला तर मनाला किती वेदना होत असतील. सकाळी बहुदा ती माता आपल्या मुलाला शाळेत सोडायला जात असावी. तो मुलगा देखील आईसोबत ॲक्टीवावर किती विश्वासाने बसलेला असेल. आई देखील आपल्या 'पिलाला' शाळेत सुखरूपपणे सोडण्यासाठी आत्मविश्वासाने निघाली असणार पण काळाच्या मनात वेगळेच होते. रहदारीच्या, वाहतुकीच्या दृष्टीने असुरक्षीत अशा चौकात आई आणि ८ वर्षे वयाच्या लेकाचा प्राण गेला. अपघातात मयत महिलेचे पती, बाळाचे वडील सैन्य दलात आहेत. ते देशाच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असताना त्यांच्या कुटुंबीयांचे संरक्षण मात्र या शहरातील बिघडलेली वाहतूक यंत्रणा करू शकली नाही. ही काही नैसर्गीक आपत्ती नव्हती. माणसाच्या चुकीमुळे हा अपघात झाला. एस. टी. चा चालक असो वा ॲक्टीवाच्या चालक महिला असो, या दोघांपैकी कोणाची तरी चूक आहे. अपघात झाला, याला कोणीतरी जबाबदार असणार आहे. उद्या न्यायालयात प्रकरण जाईल आणि एखाद्याचा खून झालेला असताना देखील सबळ पुराव्याअभावी आरोपी निर्दोष सुटावा तसे या प्रकरणात कोणालाही जबाबदार धरले जाणार नाही. असा भीषण अपघात झाल्यानंतर जनता, वाहनचालक, पोलीस, सार्वजनीक बांधकाम, आरटिओ, महापालिका तरी असे का झाले याचा विचार करून उपाययोजना करते का? तर उत्तर नाही असेच येईल. लोकशाहीत या शहराचे प्रतिनिधीत्व करणारे आमदार तर कधी शहरात वारंवार होणाऱ्या अपघाताची कारणे काय याचा कधी विचार करणार आहेत कि नाही हा प्रश्न आहे. रत्नागिरी-नागपूर हा महामार्ग या शहरातून चालला आहे. महामार्गाचे बहुतांश काम होत आले आहे. त्याच मार्गावर कालचा अपघात झाला आहे. अनेक शहरातून पुर्वी असलेले महामार्ग शहराबाहेरून नेण्याचे प्रयत्न होत असताना हा महामार्ग लातूर शहरातून जात आहे. आहे तो रस्ता याच शहरातील वाहनधारक, नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. या रस्त्यावर रोज अपघात होत आहेत. त्याच महामार्गावर कालचा अपघात झाला. याच मार्गात लातूर शहरातील राजीव गांधी चौक, नाईक चौक, कन्हेरी चौक, महात्मा बसवेश्वर चौक, शाहू महाविद्यालयासमोरील बेकायदा चौक, दगडोजीराव दादा देशमुख चौक, गरूड चौक मृत्यूचे सापळे बनले आहेत. छत्रपती चौकात औसा रोड, बार्शी रोडकडून येणारी वाहतूक शहरातील वाहतूक याने सतत कोंडी होते. या चौकात एखादा स्तंभ नाही कि उजवीकडे वळणाऱ्यांनी वळसा घालावा, प्रचंड रहदारीचा रस्ता असताना या चौकात स्पीड ब्रेकर नाही, सिग्नल नाही, सूचना फलक नाही, वाहतूक पोलीस वाहतूक सुरळीत करताना दिसत नाहीत. मात्र रोज एक व्हॅन घेऊन ४ ते ५ पोलीस शिपाई, वाहनांची कागदपत्रच तपासतात. वाहतुकीचे नियंत्रण ही त्यांची जबाबदारीच नसते. आरटीओ विभागाने वाहनांची कंडिशन तपासणी करून ते वाहन रोखले असे नाही. खरे तर पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी या शहराचे आमदार वृत्तपत्रातून आलेल्या बातम्या, अग्रलेख वाचून काही उपाय करणार असतील तरच शहरातील नागरिकांचे जिवीत सुरक्षीत राहील. या शहराच्या आमदारांनी शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग शहरातील रस्ते, त्यात निर्माण होणारे अडथळे याचा गांभीर्याने विचार करावा, वाहतूक शाखेतील पोलीस हे केवळ कागदपत्राच्या केसेस करण्यासाठीच आहेत. हा त्यांचा समज आहे. जिथे कोठे गर्दी झाली, होतेय त्याचे नियंत्रणच केले जात नाही. पण पाच-सात जण टोळीने केसेसकरतात, आता तर वाहतूक शाखेच्या समोरच संध्याकाळच्यावेळी ४ ते ५ जण उभा राहून केसेस करतात, त्याचवेळी शहरात अनेक ठिकाणी ट्राफीक जाम असते. एवढेच नव्हे मिनी मार्केटसारख्या सिग्नल चौकात सिग्नल रेड असला तरी समोरून वाहनधारक सरळ-सरळ रॉंगसाईड येतो काही फुटावर तिघे-चौघे असतात ते त्याकडे पाहत नाहीत, नाकासमोर पाहून जाणाऱ्या वाहनांना अडविले जाते. ही अवस्था लातूर शहरात सर्वत्र दिसते आहे. रस्त्यात एखादा खांब असतो, बॅनर असते. खड्डा, गटार असते पण पालिका तो बुजवून वाहतुकीसाठी रस्ता सरळ करित नाही. गुळ मार्केट चौकात बाजार समिती संकुलाच्या समोर २०-२५ फूट जागा आहे. पण मध्येच गटार, खड्डे असल्याने ते दूर करण्याचा प्रयत्नच होत नाही. कसेही दुभाजक, कोठेही जाहिरात फलक, रस्त्यातील खड्डे, अर्धवट रस्ते, पार्किंगचा अभाव, जड-अवजड वाहनांचा केंव्हाही वावर याने अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. महिनाही झाला नसेल पालिका व पोलीस प्रशासनाने गुळ मार्केटकडून शाहू महाविद्यालयाच्या समोरून मध्यवर्ती बसस्थानकाकडे मार्ग वन वे केला, जाहीर केले, पण आज दुपारपर्यंत तरी सर्रास दुचाकी, चारचाकी, वाहनांची वाहतूक चालू आहे. तिथे वाहतूक पोलीस थांबवून वाहन रोखत नाही. प्रबोधन करित नाही. लोकही लेखी आदेशाला जुमानत नाहीत. शहराच्या आमदारांनी आठवड्यातून एक दिवस तरी सर्व सामान्यांप्रमाणे दुचाकीवरून शहरातून फेरफटका मारावा तरच रस्त्याची अवस्था, पार्किंगचा अभाव, खड्डे लक्षात येतील. दुचाकीवरून जाताना पाठीमागून चारचाकी, ऑटो, ईतर वाहने कसे कट मारतात, हौशी तरूण झिगझॅग पद्धतीने वाहन कसे चालवितात हे लक्षात येईल. खड्ड्यांमुळे पाठीचे मणके कसे खिळखिळे होतात. अपुऱ्या रस्त्यावरून जाताना वाहनधारक एकमेकांची गच्ची कशी पकडतात हे लक्षात येईल. शहरातील सिमेंटचे एखादे काम कमी करा पण शहरातील वाहतूक सुरक्षीत कशी होईल, कालच्यासारखा अपघात आज, उद्या होणार यासाठी प्रयत्न करावेत.

## लातूर जिल्ह्यात भारतीय स्वातंत्र्य दिनाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा



# २० हजार हेक्टरवर रोहयोतून जिल्ह्यात बांबू लागवडीचे उद्दिष्ट

### -क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे



लातूर : केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकास कामांची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. शेतकरी, मागासवर्गीय व दुर्बल घटकातील व्यक्तींच्या उन्नतीसाठी शासनामार्फत प्रयत्न केले जात असून यामाध्यमातून लातूर जिल्ह्याच्या विकासाचा वारसा कायम सुरु राहील, अशी ग्वाही क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे यांनी आज येथे दिली.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय कार्यक्रमात मंत्री ना. बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा देताना त्यांनी जिल्ह्यातील विकासकामांचा आलेख मांडला.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, शहीद जवानांच्या वीरमाता, वीरपिता वीरपत्नी, विविध शासकीय विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शासनाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. अवकाळी पाऊस, गारपीट यासारख्या आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी एनडीआरएफ च्या निकषापेक्षा अधिक दराने नुकसान भरपाई दिली जात आहे. जिल्ह्यात मार्च-२०२३ पर्यंत गारपीट, वादळ, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकांच्या नुकसान भरपाईपोटी १० कोटी ५६ लाख ५५ हजार रुपये निधी वाटप करण्यात आला आहे. जुलै महिन्यात अतिवृष्टीने जळकोट तालुक्यासह इतर भागात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असून लवकरच मदत वितरीत करण्यात येईल. केवळ एक रुपया विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून शेतपिकांसाठी विमा संरक्षण घेण्याची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील ८ लाख ६२ हजार ३२५ म्हणजेच जवळपास ९९ टक्के शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतला असल्याची माहिती मंत्री ना. बनसोडे यांनी यावेळी दिली.

कृषि विभागाच्या राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानातून गेल्या वर्षी १२ कोटी २५ लाख १२ हजार रुपये अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक उत्पादन अभियायातून १० कोटी ३७ लाख रुपये अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे. यावर्षीसाठी १९ कोटी २९ लाख रुपयांचा आराखडा शासनास पाठविण्यात असल्याची माहिती ना. बनसोडे यांनी दिली.

बांबू लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने लातूर व सातारा या केवळ दोन जिल्ह्यांची निवड केली आहे. जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून २० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवडीचे उद्दिष्ट प्राप्त झाले असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. शेतरस्ते खुले करण्यासाठी जिल्ह्यात मोहीम राबविण्यात आली. यामध्ये सुमारे ५३० किलोमीटर लांबीचे ४०५ रस्ते अतिक्रमणमुक्त झाले आहेत. राज्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यात समाविष्ट नसलेल्या केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी दरवर्षी प्रतिव्यक्ती १८०० रुपये रोख रक्कम त्यांच्या आधार सलंग्न बँक खात्यात जमा केली जाणार आहे. लातूर जिल्ह्यात आतापर्यंत १७ हजार ७९८ लाभार्थ्यांना ८० लाख ८ हजार ९५० रुपये वितरीत करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेची प्रतिवर्ष प्रतिकुटुंब उपचाराची संरक्षण मर्यादा दीड लाखावरून ५ लाख रुपये करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच सर्व प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांना ही योजना लागू करण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने नुकताच घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी आणि शिरूर अनंतपाळ येथील ग्रामीण रुग्णालये लवकरच कार्यान्वित होणार आहेत. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेच्या आवारात ५० खाटांचा कार्डियाक केअर ब्लॉक मंजूर झाले आहे. त्याचे बांधकाम लवकरच सुरु करण्यात येणार आहे. हृदयाचे विकार असलेल्या गरीब रुग्णांना यामुळे उपचार मिळण्यास मदत होईल, असा विश्र्वास ना. बनसोडे यांनी यावेळी व्यक्त केला.

लातूर येथे विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी शासनाने अडीच कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. जळकोट तालुक्यातील जगळपूर आणि मंगरूळ येथे श्रेणी-१ पशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करण्यास मंजुरी मिळाली असल्याची माहिती ना. बनसोडे यांनी दिली.

समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून मागासवर्गीयांसाठी विविध महत्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतून ७९ कोटी ७५ लक्ष रुपये शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रात महाविद्यालयात शिकत असलेल्या आणि शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जातीच्या एक हजार ५६० विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतून ६ कोटी २२ लक्ष रुपयांचा लाभ देण्यात आला आहे, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण समाज कल्याण विभागामार्फत करण्यात येत आहे. आतापर्यंत ३ हजार १८३ ऊसतोड कामगारांना ओळखपत्र वितरीत करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

महिला सन्मान योजनेतून महिलांना सर्व प्रकारच्या एस. टी. बस प्रवास भाड्यात शासनाने ५० टक्के सवलत लागू केली आहे. १७ मार्चपासून जिल्ह्यातील ७३ लाख ९६ हजार महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अमृत ज्येष्ठ नागरिक योजना राबविली जात आहे. ७५ वर्षांवरील नागरिकांना एस. टी. बस प्रवास भाड्यात १०० टक्के सवलत देण्यात आली आहे. गतवर्षीच्या २६ ऑगस्ट पासून १ कोटी ३५ लाख ६ हजार ४३० व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेतला आहे, असे ना. बनसोडे यांनी सांगितले.

रोजगार निर्मितीसाठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना राबविली जात आहे. या योजनेतून ८६ लाभार्थ्यांना १ कोटी ६५ लाख रुपये अनुदान वितरीत करण्यात आल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. तसेच शाश्र्वत विकासाच्या ध्येयांबाबत जिल्हा विकास आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून यामध्ये जिल्ह्यातील संभाव्य संधी ओळखून, त्यामध्ये अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचे साध्य ठरविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. जिल्ह्यात गतवर्षी विविध चार खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धा झाल्या. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी यंदाही राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा, राष्ट्रीय डॉटबॉल स्पर्धा आणि राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अनेक खेळाडूंनी राज्यस्तरावर, राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बेसबॉल, सॉफ्टबॉल आणि जिम्नॅस्टिक्स या स्पर्धेत जिल्ह्यातील तीन खेळाडू सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करीत असून ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर्षी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत 'महसूल सप्ताह' आयोजित करून शासकीय योजनांच्या लाभाचे वितरण करण्यात आले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून प्रशासन अधिक लोकाभिमुख बनविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून पोलीस दलाला २४ दुचाकी वाहनांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १५ अद्ययावत चारचाकी वाहने पोलीस दलाकडे सुपूर्द करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरे झाले. अमृत महोत्सवी वर्षाच्या समारोपानिमित्त 'माझी माती, माझा देश' 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात आले. यामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सध्या मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामाची शौर्यगाथा सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात ७५ व्याख्यानांच्या मालिकेसह विविध उपक्रम राबविले जात आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन ना. बनसोडे यांनी यावेळी केले. ध्वजारोहणानंतर पोलीस पथकाने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. परेड कमांडर राखीव पोलीस उपनिरीक्षक दिलीप माने यांनी या पथकाचे नेतृत्व केले. यावेळी स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी यांचा यावेळी ना. बनसोडे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच प्रशासनात उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी, ग्रामपंचायतींचे पदाधिकारी यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. उपस्थित सर्वांची भेट घेवून ना. बनसोडे यांनी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्षारोपणाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन उद्धव फड यांनी केले.



## त्यांच्या मते....

▣ **लोकशाहीत परिवारवादी पक्ष ही विकृती आहे. परिवार वादामुळे विकासाला ब्रेक**

- नरेंद्र मोदी

☛ हि विकृती नरेंद्र मोदीच ठेचू शकतात.

▣ **काही सहकाऱ्यांनी वेगळी भूमिका घेतली आहे. पण लक्षात आल्यानंतर आज ना उद्या त्यांच्यात बदल होऊ शकतो.**

- शरद पवार

☛ समोरच्यामध्ये बदल होईल या प्रतिक्षेत आपला बदल होणार नाही याची खात्री द्या.

▣ **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सावध रहावे, मित्र म्हणून माझा त्यांना सल्ला.**

-नाना पटोले

☛ सल्ला ऐकला तर बरे.


▣ **नरेंद्र मोदी पुढच्या वर्षी स्वातंत्र्याच्या वर्धापनदिनी झेंडावंदन करतील पण ते त्यांच्या घरी.**

- मलीकार्जून खरगे

☛ या नेत्यात प्रचंड आत्मविश्वास दिसतोय.

# तत्त्वचिंतक, स्वातंत्र्यवीर अरविंद घोष

अरविंद घोष हे आधुनिक भारतातील प्रख्यात तत्त्वचिंतक, स्वातंत्र्यवीर, योगी व कवी होते. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी कोलकाता येथे एका सुसंस्कृत कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांनी त्यांना वयाच्या सातव्या वर्षीच इंग्लंडला पाठविले. अरविंद हे असामान्य बुद्धीचे विद्यार्थी होते. तेथील परीक्षांत त्यांनी अनेक बक्षिसे मिळविली. लॅटिन, ग्रीक, इंग्रजी या भाषांवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, इटालियन या भाषाही ते तेथे शिकले. भारतात आल्यावर त्यांनी बंगाली, गुजराती, मराठी व संस्कृत भाषांचा अभ्यास केला.



केंब्रिजला असताना ते तेथील 'इंडियन मजलिस' चे सचिव होते आणि त्यांनी मजलिसमध्ये क्रांतिकारक भाषणे करून भारताने सशस्त्र उठाव करूनच स्वातंत्र्य मिळवावे, असे प्रतिपादन केले. इंग्रज सरकारची नोकरी न करण्याचा निर्णय घेऊन ते १८९३ मध्ये भारतात परतले व बडोदा संस्थानच्या नोकरीत रुजू झाले.

बडोदा महाविद्यालयात प्रथम ते फ्रेंच आणि इंग्रजीचे प्राध्यापक, नंतर महाविद्यालयाचे उपप्राचार्य व नंतर प्राचार्य होते. बडोद्याच्या वास्तव्यात त्यांनी पुढील कार्याची साधना केली. योगसाधनाही ते करीत होतेच. वेद, उपनिषदे, महाकाव्ये इत्यादी संस्कृत ग्रंथांचा सखोल अभ्यास करून ते इंग्रजीत कविता, नाटके व निबंध लिहू लागले. देश स्वतंत्र झाला पाहिजे, सशस्त्र क्रांतीनेच स्वातंत्र्य मिळेल, भारताचा पुनर्जन्म झाला पाहिजे, असे प्रतिपादन ते करीत. बंगालमधील क्रांतिकारक चळवळीचे अरविंदबाबू एक प्रवर्तक होते. ते जहालमतवादी होते. वंगभंगाच्या वेळी ते कोलकात्याला गेले व तेथे नॅशनल कॉलेजचे प्राचार्य झाले. अशा या महान स्वातंत्र्यवीराचे ५ डिसेंबर १९५० रोजी निधन झाले.

# भारताच्या या रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठी लागतो पासपोर्ट आणि व्हिसा




भारतीय रेल्वे ही जगातील सर्वात मोठी रेल्वे आहे. भारतीय रेल्वे ही देशाची लाईफलाईन मानली जाते. भारतीय रेल्वे हे आशियातील दुसरे सर्वात मोठे आणि जगातील चौथे मोठे रेल्वे नेटवर्क आहे. भारतातील एकूण रेल्वे स्थानकांची संख्या सुमारे ८००० आहे. तुम्हाला कदाचित सर्व स्थानकांची नावे माहित नसतील. भारतीय रेल्वे खूप प्रगत आहे आणि देशातील रेल्वे आणि स्थानके अतिशय हायटेक झाली आहेत.

सध्या भारतीय रेल्वे अनेक हायस्पीड ट्रेन चालवत आहे. भारतीय रेल्वेने दररोज सुमारे २.५० कोटी लोक प्रवास करतात, तर ३३ लाख टन मालाचीही वाहतूक केली जाते. भारतीय रेल्वेची स्थापना ८ मे १८४५ रोजी झाली. भारतीय रेल्वेचे मुख्यालय राजधानी दिल्ली येथे आहे. १७८ वर्षे जुनी भारतीय रेल्वे अजूनही सर्वात स्वस्त आणि पसंतीची वाहतूक साधन आहे. पण तुम्हाला माहित आहे का की भारतात एक रेल्वे स्टेशन आहे, जिथे जाण्यासाठी पासपोर्ट आणि व्हिसा आवश्यक आहे.

वास्तविक, भारतीयांना या स्थानकावर जाण्यासाठी पाकिस्तानी व्हिसाची आवश्यकता असते. तुम्ही येथे व्हिसाशिवाय जाऊ शकत नाही. अटारी असे या रेल्वे स्थानकाचे नाव आहे. देशातील हे एकमेव रेल्वे स्टेशन आहे, जिथे व्हिसा आवश्यक आहे.

हे रेल्वे स्टेशन पंजाबच्या अमृतसर जिल्ह्यात आहे आणि उत्तर रेल्वेच्या फिरोजपूर रेल्वेच्या अखत्यारीत आहे. आता तुमच्या मनात प्रश्न नक्कीच निर्माण झाला असेल की हे स्टेशन भारतात असताना मग देशातील लोकांना येथे जाण्यासाठी व्हिसा का लागतो? अटारी रेल्वे स्थानक हा भारताचा भाग आहे, परंतु येथे जाण्यासाठी पाकिस्तानची परवानगी घ्यावी लागते. येथे फिरताना आढळल्यास तुरुंगात जावे लागू शकते. यासोबतच दंडही भरावा लागणार आहे. या स्टेशनमध्ये जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न केल्याबद्दल फॉरेनर्स ॲक्टच्या कलम १४ अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. असे घडले तर, दोषी सिद्ध होऊनही जामीन मिळणे फार कठीण होते आणि फौजदारी खटला चालवला जाऊ शकतो. समझौता एक्स्प्रेस ही एकमेव आंतरराष्ट्रीय ट्रेन येथून धावत होती. तिने प्रवास करायचा असेल तर तिकीट खरेदी करण्यासाठी पासपोर्ट क्रमांक द्यावा लागतो. हे रेल्वे स्थानक फक्त समझोता एक्सप्रेससाठी खुले आहे. जर या ट्रेनला उशीर झाला, तर भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या रजिस्टरमध्ये नोंद केली जाते. दिल्ली-अटारी एक्स्प्रेस, अमृतसर-अटारी डेमू, जबलपूर-अटारी स्पेशल ट्रेन देखील येथे दिसतील, परंतु त्यापैकी एकही अटारी-लाहोर मार्गावरून जात नाही.

# धो-धो बरसला तरीही राज्यातील प्रकल्प ६० टक्क्यांवरच; मागील वर्षीच्या तुलनेत १८ टक्के तूट

मुंबई : जुन अखेर ते जुलैच्या मध्यात आणि अखेरीस महाराष्ट्रात धो-धो बरसलेल्या पावसामुळे कुठे दरडी कोसळल्या तरी कुठे महापूर आले. यामध्ये नुसते झाले ते फक्त नुकसान. मात्र, त्यानंतर दडी मारलेला पाऊस पुन्हा परतत नसल्याने राज्यातील बळीराजा पुन्हा एकदा पावसाच्या प्रतीक्षेत आहे. दरम्यान, आज १४ ऑगस्टपर्यंत राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पातील जलसाठ्याची स्थिती बघितली असता या प्रकल्पातील जलसाठा हा केवळ ६१ टक्क्यांवर असून, मागील वर्षी तो याच तारखेला ७९ टक्के होता. तेव्हा यंदा मागील वर्षीच्या तुलनेत अद्याही प्रकल्पात १८ टक्के एवढी तूट असल्याचे दिसून येत आहे.

साधारणता जुन महिन्यापासून पावसाला सुरूवात होते. मात्र, यावर्षी ऐन मान्सून राज्यात दाखल होण्याच्या वेळेतच अरबी समुद्रात आलेल्या बिपरजॉय वादळामुळे राज्यात मान्सून जरा उशिरानेच दाखल झाला. यामुळे पेरण्याही खोळंबल्या होत्या. मात्र, जुनच्या अखेरीस सक्रिय झालेल्या पावसाने जुलैच्या अखेरापर्यंत राज्यात चांगलाच धुमाकूळ घातला होता. आतापर्यंत झालेल्या पावसामुळे राज्यातील प्रकल्प तुडूंब भरून उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याची चिंता मिटेल असे वाटत असतानाच आज १४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पातील जलसाठ्यात मागील वर्षीच्या तुलनेत तब्बल १८ टक्के तूट असल्याचे दिसून आले आहे. कारण, सध्या राज्यातील मोठे, मध्यम आणि लघू अशा एकुण २ हजार ९९४ प्रकल्पामध्ये सध्या ६१.१६ टक्के जलसाठा असून, तो मागील वर्षी याच तारखेला तब्बल ७९.६३ टक्के एवढा होता. त्यामुळे धो-धो बरसलेल्या पावसानंतरही राज्यातील प्रकल्प 'साठी'च गाठू शकल्याचे चित्र आहे.

# ग्रामोद्धारक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज


संत तुकडोजी महाराज यांनी 'ग्रामगीतेची' रचना करून नवभारताच्या निर्मितीचे व ग्राम सुधारणेचे महत्व या ग्रंथातून प्रतिपादिले. त्यांच्या प्रगल्भ ग्रामानुभवातून ही ग्रंथ निर्मिती झाली आहे. केवळ ग्रंथनिर्मिती करूनच ते थांबले नाहीत तर त्याला आश्रमातील स्वयंसेवकाच्या कार्यातून कृतीशीलतेची जोड दिली. या ग्रंथात एकूण ४१ अध्याय असून त्यात आठ पंचकांचा समावेश आहे. या ग्रंथातून ग्रामविकासाच्या आधारभूत घटकांचे ओवीबद्ध विवरण त्यांनी केले आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे, तेव्हा खेड्याकडे चला, असे प्रतिपादन महात्मा गांधीनी केले आणि १९२० नंतरच्या कालखंडात भारतीय आधुनिक समाजधुरीणांचे लक्ष ग्रामीण जीवनाकडे गेले. हा प्रारंभ होता असे नव्हे! कारण या आधीही भारतीय संतानी 'बुडती हे जन देखवेना डोळा' या वृत्तीने विश्र्वकल्याणाच्या दृष्टीने आपल्या साहित्यनिर्मितीतून आणि भजन कीर्तनाच्या पारमार्थिक लोक माध्यमातून हा प्रयत्न केला होता. ही प्रबोधन परंपरा महाराष्ट्रात संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकोबा, वारकरी संताची मांदियाळी, समर्थ रामदास, ते आधुनिक काळातील विनोबा, सेनापती बापट, गाडगेबाबा ते थेट या प्रस्तुत विषयाचे नायक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत येते.

यातील मध्यकाळातील संतांनी माणसाच्या पारमार्थिक व भक्तीजीवनाच्या, मानवतेच्या विकासाचे तत्वज्ञान निर्माण करून त्याचा प्रचार प्रसार केला तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांसारख्या आधुनिक राष्ट्रसंतानी नव्या काळाची पाऊले ओळखून कृतीशीलपणे याच परंपरेला नवे वळण देत, या परंपरेच्या साहित्य रचनेची व आविष्करणाची पद्धत स्वीकारून आदर्श ग्रामस्वराज्याचे स्वप्न आपल्या 'ग्रामगीतेतून' साकारले. त्यांचा हा विचार निव्वळ पारमार्थिक नसून तो इहवादी व भौतिक जीवनाशी निगडित आहे. मानवी जीवनाच्या समृद्धतेचे, त्यांच्या कल्याणाचे व त्यांच्या समग्र उन्नतीचे चित्र या विचारातून आविष्कृत झाले आहे. म्हणूनच आजच्या वैश्र्विकीकरणाच्या युगातही ते तितकेच महत्वाचे आहे. आज जग हेच एक खेडे बनले आहे असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा या विश्र्वसंकोचाच्या युगात तुकडोजी महाराजांचे हे विचार फक्त ग्रामविकासापुरते मर्यादित न राहता ते जागतिक विकासाचेच प्रतिपादन करतात.

ग्रामीण विकास म्हणजेच राष्ट्रविकास! खरे राष्ट्र हे ग्रामातच सामावलेले असते ही वस्तुस्थिती असताना आज सर्व विकासाचा केंद्रबिंदू मात्र शहरी भागामध्ये स्थिरावताना दिसत आहे. स्मार्ट सिटीचे निर्माण आवश्यकच आहे, परंतु मूलभूत पायाकडे दुर्लक्ष करून केवळ शिखराचाच आपण विकास करत बसलो तर हा चकचकीत मनोरा अत्यंत तकलादू ठरेल, अशी भीती वाटते. म्हणूनच स्मार्ट ग्रामाशिवाय कोणताही सर्वांगीण विकास होऊ शकत नाही हे सूत्र नेहमी ध्यानी ठेवले पाहिजे. त्यासाठी आज औद्योगिकीकरणाचा, उद्योग-व्यवसायाचा जे केंद्र शहरात स्थिरावले आहे ते आता गावाकडे वळवायला, विस्तारायला हवे. कृषीनिष्ठ उद्योग, व्यवसायाच्या निर्माणातून हा विकास साधायला हवा. त्यासाठी आपणास आता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संकल्पनेतील गाव निर्माण करावा लागेल. त्याची प्रसादचिन्हे अलीकडच्या काळात अण्णा हजारे, पोपटराव पवार यांच्या कृतीशील प्रयत्नातून दिसत आहेत, परंतु हे चित्र अपवादभूत आहे ते सार्वत्रिक नाही, अशा विधायक प्रयत्नांच्या कक्षा आता रुंदायला हव्यात!

संत तुकडोजी महाराज यांनी 'ग्रामगीतेची' रचना करून नवभारताच्या निर्मितीचे व ग्राम सुधारणेचे महत्व या ग्रंथातून प्रतिपादिले. त्यांच्या प्रगल्भ ग्रामानुभवातून ही ग्रंथ निर्मिती झाली आहे. केवळ ग्रंथनिर्मिती करूनच ते थांबले नाहीत तर त्याला आश्रमातील स्वयंसेवकाच्या कार्यातून



कृतीशीलतेची जोड दिली. या ग्रंथात एकूण ४१ अध्याय असून त्यात आठ पंचकांचा समावेश आहे. या ग्रंथातून ग्रामविकासाच्या आधारभूत घटकांचे ओवीबद्ध विवरण त्यांनी केले आहे. ग्रामरक्षण, ग्रामस्वच्छता, ग्रामशुद्धी, ग्रामसेना, जलसंपदामहत्व व जलसंवर्धन, वृक्षारोपण, शिक्षण, आरोग्य, अंधश्रद्धानिर्मुलन, श्रमशक्तीचे महत्व, स्वावलंबन, स्त्री-गौरव, सामाजिक सलोखा व समता या ग्रामीण जीवनाच्या विकासासाठी आवश्यक असणार्या विविध घटकांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला आहे.

त्यांचे हे सर्व विश्र्लेषण म्हणजे ग्रामीण विकासाच्या प्रेरणेचा मूर्तिमंत झरा आहे. ग्रामीण विकासाचे कृतीशील तत्वज्ञान या ग्रंथात मांडून त्यांनी सर्वांगीण ग्रामोन्नतीचे स्वप्न महाराष्ट्राच्या समाजमनात पेरले. त्यांच्या या विचारातूनच अलीकडे अनेक योजना कार्यान्वित झाल्या आहेत. तंटामुक्त ग्राम, सामुदायिक विवाह प्रथा, ग्राम सुरक्षा दले, अशी काही वानगीदाखल उदाहरणे देता येतील. या अर्थाने त्यांची ग्रामगीता म्हणजे आधुनिक ग्रामवेदच ठरते. सेनापती बापट यांनीही गावगीता लिहिली होती, त्याच धर्तीवर हा ग्रंथ म्हणजे ग्रामविकासाचे एक आदर्श प्रतीक आहे. महाराष्ट्रातील तत्कालीन अनेक विद्वानांनी या ग्रंथाची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे.

उदा. संत साहित्याचे थोर अभ्यासक प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांनी ग्रामगीतेच्या निर्मितीमागील प्रेरणा स्पष्ट करताना म्हटले आहे. 'लोकमान्य टिळक, डॉ.बेझंट, महात्मा गांधी या सर्व राष्टीय पुढार्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीच्या वेळी एक गोष्ट लोकांच्या नजरेसमोर पुन्हा-पुन्हा ठेवली व ती म्हणजे भारताची सुधारणा म्हणजे नुसती, मुंबई, पुणे यासारख्या शहरांची सुधारणा नव्हे. तर भारतातील सुमारे सात लाख खेड्यांची सुधारणा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत भारत सुधारला असे म्हणता येणार नाही. या तत्वज्ञानाने प्रेरित होऊन श्री संत तुकडोजी महाराज यांनी खेड्यापाड्यात हिंडून ती सुधारण्याचा प्रयत्न चालवला आहे. संत तुकडोजी महाराज यांचे क्रांतदर्शी द्रष्टेपण येथे दिसून येते.

आपल्या घराच्या, गावाच्या प्रगतीपासूनच खर्या प्रगतीचा ओनामा होत असतो. म्हणूनच ते म्हणतात 'मानव मात्रांचे प्रथम माहेर । आपुले गाव त्यातील घर । यातुनी प्रगती करीन सुंदर । पुढे जावे विश्र्वाच्या ।' संत तुकडोजी महाराज येथे अत्यंत साध्या भाषेत मूलभूत विचार मांडतात. सर्व ग्रामवासियांनी आपले गाव हेच आपले तीर्थक्षेत्र समजून जर आदर्श ग्रामनिर्मितीचा संकल्प केला तर नक्कीच यातून राष्ट्र विकास साधला जाईल. यासाठीच त्यांनी सर्वांना आवाहन केले, 'अरे ! उठा उठा श्रीमंतानो, अधिकार्यांनो, पंडितानो । सुशिक्षितांनो, साधुजनानो । हाक आली क्रांतीची । गावागावाशी जागवा । भेदभाव हा समूळ मिटवा । उजळा, ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ।' तमाम महाराष्ट्राला ही कळकळीची साद घालत त्यांनी ग्रामगीतेचा नंदादीप प्रज्वलित करून महाराष्ट्राचे समाजमनात चेतना जागविली.

आपले करंटेपण हेच की तुकडोजींचा हा ग्रामधर्म आपण समजून घेऊ शकलो नाही, अंमलात आणू शकलो नाही. या ग्रंथातील ओविओवितून ग्रामविकासाचा निनाद आहे. राष्ट्रविकासाची तळमळ आहे आणि आदर्श ग्राम्रराज्याचे स्वप्न तरळते आहे. ज्याप्रमाणे आपण अतिशय भक्तिभावाने अनेक ग्रंथाचे पारायणे करतो तशीच या ग्रंथाचे पारायणे होऊन यातील विचार कृतीशीलपणे अमलात आला असता तर या धरेवर राष्ट्रसंताच्या मनातील आदर्श ग्रामजीवनाचा स्वर्ग अवतरला असता.

ग्रामगीतेच्या ३९ अध्यायामध्ये संत तुकडोजी महाराज यांनी भू-वैकुंठ या शीर्षकाखाली ग्रामराज्याची संकल्पना रेखाटली आहे. त्यांचे हे प्रकरण म्हणजे ग्राम विकासाचा गाभाच जणू! महात्मा गांधींच्या कल्पनेतील स्वराज्य, रामराज्य कसे असावे याचे प्रतिपादन यात आहे. याच अध्यायात ते म्हणतात 'ग्रामराज्याची रामराज्य । स्वावलंबन हेची स्वराज्य । बोलिले महात्मा विश्र्वपुज्य । विकास त्यांचा सुंदर हा ।' महात्मा गांधींबद्दलचा आदरभाव येथे व्यक्त करतात त्याबरोबरच या अध्यायातून त्यांनी जो उपदेश केला आहे त्यातून त्यांच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचे व प्रागतिक विचारांचे दर्शन घडते. आपल्या कृतीतून आपण आपले गावच वैकुंठ बनवू शकतो हे सूत्र आशयाच्या केंद्रस्थानी ठेऊन त्यांनी ग्राम विकासाचा गाभाच येथे सांगितला आहे.

उदा.ते म्हणतात, 'सर्व जणांचे समाधान । याहुनी स्वर्ग नाही महान । नांदती द्वेष -मत्सराविण। बंधुभावे सर्व जेथे ।' जर संपूर्ण गाव एका कुटुंबाप्रमाणे नांदला तर 'आनंदाचे डोही आनद तरंग' अशी सार्वत्रिक भावना होईल. सर्वांसाठी एकच शाळा, गावात आलेला पाहुणा तो ग्रामा अतिथी, समतावाद, गावाचे आर्थिक नियोजन, ग्राम अर्थसंकल्प, संततिनियमन, सहकार व सहकार्य, व्यसनबंदी, एकत्र उत्सव, उनाडकी व दंडेलशाहीला निर्बंध, तंटामुक्ती, अशा विविध बाबींची चर्चा यात आहे. आपले गाव हेच एक राज्य आहे ही स्वयंपूर्ण गावाची संकल्पना येथे मांडली आहे.

म्हणूनच अत्यंत अभिमानाने त्यांनी म्हटले आहे, आमुचे ग्रामची एक राज्य । सर्वांचे माहेर अविभाज्य । सामुदायिक विवाहाचे समर्थन करताना त्यांनी लिहिले आहे, 'गावच्या मुला - मुलींचे लग्न । सामुदायिक पद्धतीच प्रमाण । लग्नात होणार्या अमाप खर्चाबद्दल त्यांनी म्हटले, लाग्नादिकासाठी कोणा । उडवू न द्यावे गावच्या धना । शहरामध्ये शिशुसंगोपन गृहे, पाळणाघरे निर्माण झाली आहेत, त्याचाही विचार तुकडोजींनी येथे केला आहे. त्यांच्या साक्षेपी व सर्वव्यापी प्रतिभेचे दर्शन येथे घडते. 'गावाने करावे शिशुसंगोपन । म्हातार्या, प्रेमळ बायांकडोन । जयाचेनि काम भिन्न । होत नाही कष्टाचे ।', तुकडोजींच्या दूरदृष्टीचे व त्यांच्या नियोजन सामर्थ्याचे हे द्योतक आहे.

आजच्या वाढत्या संकुचित आणि व्यक्तीनिष्ठ विचारांच्या युगधर्मामध्ये संत तुकडोजींचे विचार हे आदर्शवादी वाटतील, परंतु राष्ट्रविकासासाठी त्यांची नितांत आवश्यकता आहे. कालक्रमानुसार त्यांच्या आजच्या युगाशी संवादी अशा विचारांच्या जागराची आज गरज आहे. यासाठी तरुणांनी एकत्र येऊन या राष्ट्रसंताचे विचार कृतीत आणणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे वारकरी पंथाच्या माध्यमातून हरीभक्तिचा गजर होतो तसाच आता ग्रामभक्तीचा व पर्यायाने ग्राम विकासाचा कृतीशील गजर होणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामगीता ही ग्रामविकासाचा ग्रामवेदच आहे.

**-अशोक लिंबेकर**

# लालपरी कात कधी टाकणार मोडका संसार कधी सुधारणार!

एसटी महामंडळाकडे जवळपास १८ हजार ४४९ जुन्या बसेस आहेत. नवीन बसेसची खरेदी न झाल्याने जुन्याच खिळखिळया बसेसवर महामंडळाचा डोलारा धावडवला जात आहे. नुकतेच निधन झालेले रानकवी ना. धों. महानोर यांनी आपल्या काव्यातून गावाकडच्या निसर्गरम्य परिसरासोबत तिथल्या समस्याही सरकार दरबारी मांडल्या. 'जैत रे जैत' या चित्रपटातील त्यांच्या काव्याला अनुसरून गावखेड्यात प्रवाशांना फिरवणारी लालपरी कात कधी टाकणार आणि तिचा मोडका संसार कधी सुधारणार याची प्रवाशांना प्रतीक्षा आहे.


महाराष्ट्राची लाईफलाईन असलेल्या 'एसटी'ने अमृत महोत्सव साजरा केला आहे. तिला एसटी, लालपरी, अगदी लाल डब्बाही म्हणतात. सर्वसामान्यांच्या प्रवासासाठी एसटी हाच एक विश्र्वासाचा आधार आहे. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय', 'जिथे रस्ता, तिथे एसटी', 'प्रवाशांच्या सेवेसाठी', 'एसटीचा प्रवास, सुखाचा प्रवास' असे वेगवेगळे नारेही सरकारने दिले, मात्र सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या एसटीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचेच चित्र आहे. सरकारकडे या व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक नसल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आणि नागरिकांनी 'खासगी' वाटा निवडल्या. कारण, अपेक्षित सोयी-सुविधा मिळत नसतील, तर पर्याय शोधणे हा मानवी गुणधर्म आहे.

राज्यात सध्या एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, कुरघोड्या, उणी-दुणी काढण्याची स्पर्धा लागली आहे. या सार्या गदारोळात शासनाकडे आस लावून बसलेल्या सामान्य व्यक्तीचा हिरमोड झाला आहे. प्रसंगी त्याचे नुकसानही होत आहे. सामान्यांच्या हिताकडे लक्ष न देता आगामी निवडणुका लक्षात घेऊन सध्या चर्चा होत आहेत, हे वेगळे सांगण्यासाठी कोणत्या भविष्यवेत्याची गरज नाही. वास्तवाकडे सरकारला लक्ष देण्यासाठी भाग पाडणारे विरोधकही ना राज्यात सक्षम आहेत, ना केंद्रात सक्षम आहेत. राज्यात तर अनेक समस्या आहेत; त्यावर सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र येऊन त्यातून मार्ग काढणे ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे, परंतु त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. याला राजकारणी जेवढे दोषी आहेत तेवढेच सामान्य नागरिकही दोषी आहेत. जोपर्यंत राज्यातील जनतेला त्यांची योग्य जबाबदारी समजत नाही, तोपर्यंत त्यात फारसा फरक पडण्याची अपेक्षा करणे गैर आहे.

एसटीने लालपरीपासून सुरू केलेला प्रवास एशियाड, हिरकणी, शिवनेरी, शिवशाही ते विठाई असा सुखद टप्प्यावर आणला आहे. १९२० सालच्या सुमारास अनेक उद्योजकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरू केली होती. त्यामुळे हेवेदावे आणि अनियंत्रित भाडेवाढ यांसारख्या समस्या उद्भवू लागल्या. त्यामुळे त्यावर अंकुश ठेवण्यासाठी मोटार वाहन अधिनियम १९३९ अस्तित्वात आणला गेला. कायद्याने खासगी वाहतूक व्यावसायिकांची संघटना तयार करण्यात आली. यामुळे समस्यांवर नियंत्रण आलेच, पण प्रवाशांसाठी खूप सोयी निर्माण झाल्या. ठराविक थांबे, वेळापत्रक निश्र्चित भाडे इत्यादी सुविधांमुळे प्रवास सुकर होऊ लागला. एसटी महामंडळाकडे जवळपास १८ हजार ४४९ जुन्या बसेस आहेत. राज्यात नवीन बसेसची खरेदी न झाल्याने जुन्याच खिळखिळ्या बसेसवर महामंडळाचा डोलारा काम करतो आहे. खासगी वाहतुकीला आळा घालण्याचे आवाहन केले जात असले, तरी त्यासाठी एसटीला सुविधाच दिल्या जात नसतील, तर प्रवासी चार पैसे जास्त मोजून खासगीकडे वळले, तर त्यात सामान्य नागरिकांना दोष देता येणार नाही. शहरी भागात इतके जाणवत नसले तरी ग्रामीण महाराष्ट्रात अजूनही लाल डब्याला पर्याय नाही.

'गाव तेथे एसटी' या ब्रीदवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सातत्याने काम करीत आहे, पण प्रवाशांना खासगीचा सहारा का घ्यावा लागला, याचे उत्तर महामंडळ आणि त्यावर अंकुश ठेवणार्या सरकारने शोधलेले नाही. कदाचित, त्याचे उत्तर कागदोपत्री तयार असेल, पण ते वास्तवात उतरवण्यासाठी उपाययोजना करण्याची मानसिकताही दिसत नाही. राज्य परिवहन महामंडळाने स्व. बाळासाहेब ठाकरे बसस्थानक स्वच्छता स्पर्धा सुरू केली. बसस्थानक, बसेस आणि परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी त्या त्या आगार प्रमुखांची असली, तरी त्यांना आवश्यक सुविधा पुरवण्याची, त्यांच्याकडून काम करून घेण्याची जबाबदारी कोणाची हा मूळ प्रश्न अनुत्तरित आहे. बस डेपोत रात्री मुक्कामी असलेल्या चालक-वाहकांची आरामाची खोली बघितल्यानंतर यापेक्षा कारागृह बरे असेच म्हणावे लागेल.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेच्या मनात पोहोचण्यासाठी शोधलेला एक उपाय म्हणजे गावोगावच्या एसटी प्रवासात महिलांसाठी दिलेली ५० टक्के भाडे सवलत. यामुळे हाफ तिकीटवाल्या महिला प्रवाशांची संख्या तर वाढलीच शिवाय केंद्राप्रमाणेच ज्येष्ठांना पूर्णपणे मोफत प्रवास जाहीर केल्याने अनेक ज्येष्ठांनीही आपले उरले-सुरले प्रवासाचे स्वप्नही साकार करीत घराबाहेर पडणे पसंत केले. एसटीच्या या हाफ तिकीट योजनेला संपूर्ण राज्यातून भरघोस प्रतिसाद मिळाला. त्यावर अनेक पुरुष प्रवाशांनी टीका करून कायदा काय अन् सवलती काय, सगळ्याच कशा काय बायकांना मिळतात, असा नाराजीचा सूरही आळवला. विशेष म्हणजे या हाफ तिकीट सवलतीतही एसटीने



चांगली कमाई केली.

काही दिवसांपासून ठराविक धार्मिक स्थळांकडे जाणार्या गाड्यांमधील प्रवाशांवर नजर टाकली तर हल्ली बहुतांश देवस्थानांकडे साकडे घालण्यासाठी राज्यातून फक्त महिलांनी आघाडी घेतल्याचे लक्षात आल्याने एसटीने काही ठिकाणी आता हा हाफ तिकीट दर बदलून तो पाऊण तिकीट असा केला आहे. अर्थातच यासाठी प्रवाशांची पसंतीच मिळत आहे. असे असले तरीही मिळालेल्या नफ्याचा आणि वेळोवेळी सरकारी तिजोरीतून जमा होत जाणार्या निधीचा उपयोग महामंडळाच्या उर्जितावस्थेसाठी किती आणि कसा केला जातो, हाच प्रश्न आहे.

महाराष्ट्र हा खेड्यांचा प्रदेश आहे. डोंगर दर्यात वसलेल्या गावांना जोडण्यासाठी एसटीसारखे दुसरे सुरक्षित साधन नाही, यावर कोणाचेही दुमत असू नये. खासगी प्रवासी वाहने, त्यात कोंबून भरणारे प्रवासी आणि अर्धे अधिक गाडीच्या बाहेर येत बेदरकारपणाने वाहने दामटवणारी खासगी वाहने पाहिली तरी धडकी भरावी अशी अवस्था प्रत्येक एसटी स्थानकाच्या दारात नित्याने दिसते आणि तरीही मोडकळीस आलेल्या एसटीचे पुनरुज्जीवन अधिक चांगल्याप्रकारे आणि ताताडीने करावे अशी मानसिकता ना महामंडळाची दिसते, ना सरकारची जाणवते. आज मुंबईत जसा लोकलने प्रवास केल्याशिवाय पर्याय नाही, अगदी त्याचप्रकारे दैनंदिन व्यवहार, नोकरी, शिक्षण, बाजार, दवाखाना, कोर्ट कचेरी, प्रशासकीय कामे आदी अनेक कारणांकरिता दर दिवशी लाखो प्रवासी एसटीवर अवलंबून आहेत. मग या प्रवाशांना किमान सुरक्षित आणि भरवशाचा स्वच्छ, दिलासादायी प्रवास देणे ही सरकारची जबाबदारी नाही का?

सध्या पावसाळा सुरू आहे. कोकणासह महाराष्ट्रातील कोणत्याही एसटी स्थानकांत जा, खड्ड्यांचे, चिखलाचे, घाणीचे साम्राज्य. तुटलेली फुटलेली सार्वजनिक शौचालये स्थानकाच्या दारातच ठाण मांडून बसलेले पथारी, हातगाडे, काळ्या-पिवळ्या खासगी गाड्या त्यातच भिकारी अशी अक्षरश: एकप्रकारे अनास्थेची आणि बेजबाबदारीची लक्तरे जणू पसरलेली दिसतात. सरकार आपल्या कामाची जाहिरातबाजी करून घेताना अशा जाहिराती आणि आपले मुखवटे हे फक्त सुशोभित वाहनांवर झळकले जावे यासाठी धडपडते. हा खर्च कमी करून राज्यातील प्रत्येक आगारात स्वच्छता, सुसूत्रता, गर्दीवर नियंत्रण, उत्तम प्रशासकीय व्यवस्था, सुरक्षा, दुरुस्त गाड्या आणि किमान आजारी पडायला लावणार नाहीत अशी सार्वजनिक शौचालये, आदी सुविधा त्वरेने देऊ केल्या, तर निश्र्चितच महामंडळ नुकसानीच्या गर्तेतून बाहेर येण्यास मदत होईल. रेल्वेप्रमाणे महामंडळासाठीही खासगी कंपन्यांकडून आर्थिक मदत घेतली जाते. त्यातून 'बांधा, वापरा आणि हस्तांतर करा' या धर्तीवर राज्यातील काही स्थानकांचा चेहरा बदलण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यातही भ्रष्टाचार आणि खाबुगिरी आड आल्याने अनेक स्थानके वापराविना, अर्धवट बांधकाम केलेली, अजूनही हस्तांतरित न झालेली किंवा अर्धवटच हस्तांतरित झाल्याने पुढची जबाबदारी कुणी घ्यायची? अशा विवंचनेत असणारी अनेक एसटी स्थानके आजही काहीतरी चांगलेच घडेल या प्रतीक्षेत आहेत. ज्या धार्मिकस्थळांना रोज लाखोंच्या संख्येने भाविक भेट देतात, तेथील स्थानकांची, आगाराची अवस्था अत्यंत दयनीय आहे. पावसाळ्यात तर तिथे गाड्या आगारात जाऊ शकत नाहीत. संपूर्ण आगर चिखलाने भरलेले असते.

एसटी महामंडळापासून विभक्त होत ठिकठिकाणच्या नगरपालिका, महानगरपालिकांनी स्थानिक शहर बस सेवा सुरू केल्या आहेत. त्यातही कंत्राटदारांनी आपले 'खेळ' सुरू केले आहेत. चार चार महिने चालक-वाहकांचे पगार थकीत राहतात आणि मग सलग आठ-आठ दिवस या बसेस शहरातून गायब होतात. अशावेळी पुन्हा एकदा खासगी वाहने, रिक्षावाले डोके वर काढतात. त्यातून त्यांची मनमानी, अर्वाच्य भाषा, भाडे नाकारणे व अडवून भाडे मागणे आदी गोष्टी नित्याच्या होतात. एकंदरच जिथे जिथे सरकारी यंत्रणांनी सक्षमपणाने नियंत्रण करावयाचे आहे, तिथे तिथे हमखास डोळेझाक सुरू आहे आणि त्यातूनच अनंत समस्यांची निर्मितीही अव्याहतपणाने सुरू आहे. हे थांबण्यासाठी सार्या प्रवाशांनी एकजुटीने 'हक्काचा प्रवास सुरक्षित प्रवास', या ब्रीदावर एकत्रित येण्याची गरज आहे. कारण जोवर ही एकजूट वज्रमूठ बनून सत्ताधार्यांवर आघात करणार नाही तोवर सार्वजनिक समस्यांचा अंत नाही, हे लक्षात घेण्याची हीच योग्य वेळ आहे.

**- विजय बाबर**

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## मेथी काढा घ्या आणि शुगरवर नियंत्रण मिळवा

डायबिटीज हा असा एक आजार आहे ज्याचा थेट संबंध तुमच्या लाईफस्टाईलशी संबंधित आहे. तुम्ही काय खाता किती खाता आणि ते कसे पचवता यावरच तुमची शुगर लेवल अवलंबून असते. यामुळे डायबिटीज पेशंटला डॉक्टर नेहमी योग्य डाएट करण्याचा सल्ला देतात. पण त्याचबरोबर जर तुम्ही आहारात मेथीचाही समावेश केलात तर तुमची शुगर लेवल कायम नियंत्रणात राहण्यास मदत होईल.

मेथीमध्ये प्रोबायोटिक्सचे गुण असतात जे रक्तातील शुगर कमी करण्यास मदत करतात.



मेथीमध्ये आढळणारा अल्कलॉईड इन्सुलिनला नियंत्रणात ठेवतो. ज्यामुळे शुगर लेवल कमी होते. औषधांनीही शुगरवर नियंत्रण ठेवता येते. पण मेथीने देखील शुगर लेवल कमी होते.

त्यासाठी मेथीचा काढा नियमित घ्यावा.

मेथीचा काढा बनवण्यासाठी सुरुवातीला एक चमचा मेथी दाणे घ्यावे. ते मिक्सरमध्ये बारीक करून घ्यावे. नंतर एका पातेल्यात पाणी घेऊन त्यात ती मेथी पावडर टाकावी. हे मिश्रण १० ते १५ मिनिट उकळून घ्यावे. नंतर गाळून प्यावे.

दह्याबरोबरही मेथी खाल्ल्याने रक्तातील वाढलेली शुगर नियंत्रणात येण्यास मदत होते. यासाठी एक चमचा मेथीची पावडर दह्यात मिक्स करून त्याचे सेवन करावे.

गरम पाण्यात मेथीचे दाणे भिजवून ते खावे. यामुळे शुगर तर नियंत्रणात राहील त्याचबरोबर सतत खा खा होणार नाही. यामुळे वजनही नियंत्रणात राहील.

मेथीला मोड आणून ती खावी. तसेच रात्रभर एका ग्लास पाण्यात मेथीचे दाणे भिजवावेत. सकाळी तेच पामी गाळून प्यावे.

## अनिद्रा या विकारापासून दूर कसे राहता येईल?

१. वेगवेगळ्या कारणांनी आलेला ताण-तणाव, डिप्रेशन कमी केल्यास फायदा होतो. त्याकरिता योगासने, प्राणायाम, ध्यान करणे, सकाळी किंवा सायंकाळी फिरणे किंवा तत्सम हलका-फुलका व्यायाम करावा.

२. व्यसनापासून मुक्त होऊन सकारात्मक विचार व सकारात्मक जीवन जगण्याचा यशस्वी प्रयत्न केल्यास या व्याधीपासून दूर राहता येईल.

३. जेवणाच्या वेळा ठरवून त्या वेळी नियमित जेवण घेणे, पचायला हलका आहार घेऊन चयापचय बिघडणार नाही याची काळजी घेऊन चहा, कॉफी, शीतपेय यापासून दूर राहिल्यास ही व्याधी जडणार नाही.

४. नियमित व्यायाम केल्यास शरीर हलके व स्वस्थ होते; परंतु झोपण्यापूर्वी व्यायाम टाळावा. सकाळी योगासने, प्राणायाम केल्यास अधिक लाभ होतो.

५. झोपण्याची वेळ व पहाटे उठण्याची वेळ निश्चित करावी.

६. झोपताना शरीर ढिले करून दीर्घश्वसनाचा अभ्यास करावा.

७. सायंकाळी कोमट पाण्याने किंवा उन्हाळ्यात सामान्य पाण्याने स्नान केल्यास लाभ होतो.



८. शक्यतोवर अलार्म लावू नये. क्वचित प्रसंगी गरज भासल्यास लावला तर चालेल.

९. झोपताना अर्धा ग्लास गरम दूध प्यावे. स्थूल व्यक्तीने मात्र दुधाचा प्रयोग करू नये.

१०. शरीरास हलका मसाज केल्यास अत्यंत लाभ होतो.

अशा प्रकारे आपली दिनचर्या व आहार-विहार ठेवल्यास अनिद्रेपासून दूर राहता येईल व निरोगी जीवन जगता येईल.

## शिळे अन्न खाल्ल्याने होऊ शकते लिव्हर खराब!

जागतिक किर्तीचे संशोधक डॉ. बरूच ब्लूमबर्ग यांनी 'हेपेटायटिस ई' या विषाणूचा शोध लावला. त्याबद्दल त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानितही करण्यात आले. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आज, २८ जुलै रोजी हा दिवस जागतिक हेपेटायटिस दिवस साजरा केला जातो. हेपेटायटिस हा एक आजार असा आहे जो मानवी यकृताला हानी पोहोचवितो. यकृत शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकून त्याचे शरीर डिटॉक्सिफाय करण्याचे काम करते. हेपेटायटीस ५ प्रकारचे असते - हेपेटायटीस -बी, सी आणि हेपेटायटीस -ए, डी, ई. हेपेटायटीस -बी, सी, डी शरीराच्या संक्रमित द्रवपदार्थांच्या संपर्कातून पसरतो. तर हेपेटायटीस -ए, ई दूषित तसेच शिळे अन्न खाण्यापिण्यामुळे होत असतो.



डॉक्टरांच्या मते, हेपेटायटीस हा प्राणघातक आजार एखाद्या व्यक्तीला कमी वेळात मारू शकतो. तसेच तो आपल्या यकृतस कायमचे नुकसान देखील पोहोचवू शकतो. म्हणून, हेपेटायटीस संक्रमित रुग्णांना खाण्यापिण्याची खूप काळजी घेणं आवश्यक असते. खाण्या-पिण्याच्या वाईट सवयी यकृताच्या नुकसान कारणीभूत ठरू शकतात. हेपेटायटीस च्या रूग्णांनी काय खावे आणि कोणत्या गोष्टी टाळाव्या जाणून घ्या.

हेपेटायटीस असणाऱ्या रूग्णांनी संपूर्ण आहार घेणं आवश्यक असते. हेपेटायटिसच्या रूग्णांसाठी सर्वात आरोग्यासाठी उपयुक्त म्हणजे संपूर्ण आहार. तुम्ही ओट्स, राई आणि कॉर्न सारख्या पदार्थी खाऊ शकता.

यकृताचे रोग नियंत्रित ठेवण्यासाठी, तुमच्या आहारात फळ आणि भाज्यांचा नियमित वापर करा. पोषक तत्वांनी युक्त असलेल्या भाज्या आणि फळे आवर्जून खावीत. त्यात बरेच अँटीऑक्सिडेंट देखील आढळतात जे तुमच्या यकृत पेशी खराब होण्यापासून बचाव करतात.

हेपेटायटीसच्या रूग्णांनी स्टार्च जास्त प्रमाणात असतील अशा भाज्या आणि फळांचे सेवन करावे. आपण हेपेटायटीस रिकव्हरी डाएटमध्ये बटाटे समाविष्ट करू शकता. याशिवाय फक्त ताजे व सिझनल फळे व भाजीपालाच खाण्यावर भर द्या. हेपेटायटिसच्या रुग्णांनी त्यांच्या आहारामध्ये प्रथिनांची विशेष काळजी घेतली पाहिजे. हे लोक कमी चरबीयुक्त दूध किंवा दुग्धजन्य पदार्थांच्या रूपात प्रथिने घेऊ शकतात. याशिवाय चिकन, शेंगा भाज्या, अंडी आणि सोयाबीन सारख्या प्रथिनयुक्त पदार्थ देखील खाऊ शकतात.

## ५ जी नेटवर्कमुळे होऊ शकतात कॅन्सर आणि वांझपणासारखे गंभीर आजार

भारताबरोबरच जगभरामध्ये नेक्स्ट जनरेशन नेटवर्क ५जी वर काम सुरू आहे. सॅमसंगने ५जी स्मार्ट फोन बाजारात आणले आहेत तर अनेक कंपन्या ५ जी कनेक्टेड कार बाजारात आणत आहेत. चीनने देखील ५जी च्या व्यावसायिक वापरासाठी हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे चीनच्या टेलीकॉम क्षेत्रात क्रांती होणार आहे. ५जीच्या स्पीडबद्दल सांगण्यात येत आहे की, यामुळे मोठमोठ्या फाईल्स सहज डाऊनलोड करणे शक्य होतील. मात्र याचबरोबर ५जी मुळे आरोग्यावर होणाऱ्या चर्चांबद्दल देखील मोठ्याप्रमाणात चर्चा होत आहे. सांगण्यात येत आहे की, ५जी मुळे कॅन्सरसारखे आजार होण्याची देखील शक्यता आहे. जाणून घेऊया ५जी मुळे काय परिणाम होतील.




रशियन टाइम्स चॅनेलने काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमामध्ये ५जी मनुष्यासाठी घातक असल्याचे सांगितले आहे. कार्यक्रमाच्या पॅनेलमध्ये बसलेल्या तज्ञांनी दावा केला आहे की, ५जी राष्ट्रांच्या सुरक्षेसाठी धोकादायक असून, मनुष्याच्या आरोग्यावर देखील याचा प्रभाव पडेल. चॅनेलच्या रिपोर्टमध्ये दाखवण्यात आले आहे की, ५ जीच्या रेडिएशनमुळे कॅन्सर, वांझपणा आणि अल्जाइमरसारखे गंभीर आजार होऊ शकतात. असे असले तरी वैज्ञानिकांनी चॅनेलच्या या दाव्याबाबत पुष्टी केलेली नाही. तसेच चॅनेलने देखील या दाव्याबाबत काही ठोस वैज्ञानिक पुरावे दिलेले नाहीत.

मोबाईल फोनमध्ये उपयोग करण्यात येणाऱ्या विद्युत चुंबकिय विकिरणांबद्दल अनेक देशांमध्ये वेगवेगळी मते आहेत. अनेकांचा दावा आहे की, ५जी मुळे अनेक प्रकारचे कॅन्सर होऊ शकतात. वर्ष २०१४ मध्ये विश्व आरोग्य संघटनेने आपल्या रिपोर्टमध्ये म्हटले होते की, मोबाईल फोनच्या नेटवर्कमुळे आरोग्याला कोणताही धोका नाही. मात्र संघटनेने इंटरनेशनल एजेंसी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरद्वारे सांगितले की, रेडिओ फ्रिक्वेंसी रेडिएशनमुळे कॅन्सर होऊ शकतो. मोबाईल सिग्नल हे रेडिओ फ्रिक्वेंसीवरच काम करतात.

अनेक लोकांना माहिती आहे की, एक्सरे, एफएम रेडिओ आणि कंम्प्युटरमधून विकिरणे निघतात. ही विकिरणं दोन प्रकारची असतात. एक म्हणजे आयोनाइजिंग आणि दुसरे म्हणजे नॉन आयोनाइजिंग. नॉन आयोनाजिंग विकिरण कमजोर असतात. ते मनुष्याच्या शरीरातील केमिकल बॉन्ड्स तोड्यास सक्षम नसतात. एफएम रेडिओ, एक्सरे, मोबाईल आणि वाय-फाय हे नॉन आयोनाइजिंगच्या श्रेणीमध्ये येतात. तर आयोनाइजिंग श्रेणीमध्ये एक्सरे येतात. जे आरोग्यासाठी घातक आहेत. यानुसार ५जी आरोग्यासाठी नुकसानकारक नाही. मात्र चोवीस तास ५ जी नेटवर्कच्या जवळ असणे धोकादायक ठरू शकते.

## बाळाला पुरेशी झोप मिळतेय का?

बाळाच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेशी झोप मिळणे अत्यावश्यक आहे. ब-याचदा रात्र-रात्र बाळ झोपत नाही. सुरुवातीच्या काही महिने अशा तक्रारी सामान्यपणे दिसू शकताता, मात्र बाळ सहा महिन्यांचे झाल्यानंतरही अशा प्रकारच्या तक्रारी येत असतील, तर आपल्या बाळाच्या झोपेचे योग्य वेळापत्रक तयार करणे आवश्यक आहे.

बाळाची झोपेची समस्या केवळ बाळालाच नाही, तर पालकांनाही त्रासदायक ठरू शकते. बाळासोबत पालकांनाही थकवा जाणवू शकतो. पुरेशी झोप न झाल्याने बाळ चिडचिडे, उदास, अस्वस्थ होऊ शकते. बाळाची चिडचिड होऊ नये म्हणून तसेच बाळाला निरोगी आणि आजारपणांपासून दूर ठेवण्यासाठी बाळाला पुरेशी झोप मिळणे आवश्यक आहे. बाळाचे शरीर अजूनही विकसित होत असल्याने बाळाला पुरेशी झोप आणि आराम मिळाल्यास बाळाच्या शरीराचे कार्य उत्तमरीत्या सुरू राहते. प्रतिकार प्रणालीच्या आणि मेंदूच्या विकासासाठी बाळाला पोटभर अन्न आणि चांगली झोप मिळणे आवश्यक असते.



झोपेचे वेळापत्रक तयार करा : आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच बाळासाठी तुम्ही झोपेचे चांगले रुटीन वेळापत्रक तयार करा. आपल्याला हे जाणून आश्चर्यचकित वाटेल, पण आपल्या बाळाला उशिरा झोपण्यामुळे झोपेचा त्रास होऊ शकतो हे तितकेच खरे आहे.

बाळाला पुरेशी झोप मिळतेय का हा तपासा : झोपेची आवश्यकता वयानुसार बदलू शकते. म्हणूनच, डॉक्टरांशी बोलणे आणि आपल्या बाळाला किती झोपेची आवश्यकता असू शकते हे जाणून घेणे चांगले ठरेल. बाळांना रात्र आणि दिवस ह्यामधील फरक कळू द्या. फक्त बाळाला रात्र झाल्यावर झोपायचे असते आणि दिवसा खेळायचे आणि दूध प्यायचे असते हे समजले पाहिजे. तुम्ही बाळाचे झोपेचे वेळापत्रक करू शकता.

आजूबाजूचा परिसर शांत ठेवा : बाळाच्या झोपेची जागा शांत असावी जेणेकरून आवाजामुळे झोपेत अडथळा येणार नाही. बाळ झोपले असताना बाळाच्या खोलीत तीव्र प्रकाश येता कामा नये, याची काळजी घ्यावी. झोपेची जागा स्वच्छ असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता वेळोवेळी बेडशीट्स बदलणे, बाळाचा बिछाना स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. बाळाला शांत झोप लागावी याकरिता बाळाच्या अंगावर सुती कपड्यांचा वापर करावा.

**-डॉ. जगदीश काथवटे, नवजात शिशू तज्ज्ञ**

## श्रावणमध्ये या ५ वस्तूंचे सेवन करा, भरपूर ऊर्जा मिळेल





पावसाळ्यात इतर हंगामाच्या तुलनेत पाचक प्रणाली कमकुवत होते. अशात उपवास करत असणाऱ्यांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. खाण्यापिण्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे कारण की जेव्हा पाचन तंत्रावर परिणाम होतो तेव्हा प्रतिकारशक्ती कमकुवत होण्यास सुरवात होते. तर जाणून घ्या की श्रावणात उपास करताना कोणत्या प्रकारे फळाहार करावा ज्याने एनर्जी कायम राहील.

१. सकाळी १ ग्लास दूधाचं सेवन करावं. यासोबत आपण केळी देखील खाऊ शकतात किंवा बदाम खाऊ शकतात. याने वारंवार भूक लागल्यासारखं जाणवणार नाही. दुधात कॅल्शियम, प्रोटीन, व्हिटॅमिन बी-२ आढळतं आणि केळीत पोटॅशियम, व्हिटॅमिन सी आणि फायबर आढळतं ज्याने कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते.

२. कधीही रिकाम्या पोटी राहू नये. याने आपल्याला ॲसिडिटी, पोटदुखी, डोकेदुखी असे त्रास उद्भवू शकतात. त्याऐवजी मुठभर सुके मेवे खावे.

३. शिंगाड्याच्या पिठाचे पदार्थ खाणे योग्य ठरेल. त्यात आढळणारे फायबरने फायदा होईल. पुन्हा पुन्हा भूक जाणवणार नाही, अशक्तपणा जाणवणार नाही आणि पोट देखील भरेल.

४. पाणीदार फळांचे सेवन करावे. या दरम्यान शरीरात पाण्याची कमी होणा कामा नये. याने कमजोरी जाणवू लागते. शरीरात पाण्याची कमी असल्यास अशक्तपणा जाणवतो.

५. १ वाटी दह्याचे सेवन करावे. दही लो फॅट असावं. याने पाण्याची कमतरता जाणवणार नाही. शरीर हायड्रेटेड राहील. आप यात फळं आणि ड्राय फ्रुट्स देखील मिसळू शकता.

## पावसाळ्यात दम्याच्या रुग्णांनी राहा सावध, अशी घ्या स्वत:ची काळजी



पासळ्यामध्ये अनेक आजारांचा सामना लोकांना करावा लागतो यामध्ये डेंग्यू, मलेरिया, टायफाईड सारख्या आजारांबरोबर दमा असणाऱ्या लोकांना पावसाळ्यात त्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागते. दम्याचा त्रास हा माणसाच्या फुफुसांवर थेट परिणाम करतो. यामुळे दम्याच्या रुग्णांना जलद गतीने चालण्यास,बोलण्यास ,श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. तसेच हा आजार गंभीर झाल्यास फुफुसांवर सूज देखील येऊ शकते. याची सुरुवात फंगस, धूळ, प्रदूषण, जनावरे, व्हायरल इन्फेक्शन तसेच वातावरणात होणाऱ्या अचानक बदलावामुळे दमा होण्याची शक्यता आहे.

गुरुग्राम मधील कोलंबिया एशिया रुग्णालयातील क्रिटिकल केयर आणि पल्मोनरी-सीनियर कंसल्टंट डॉ. पीयूष गोयल यांच्या मते, मॉन्सून दम्याचे रुग्ण तसेच त्रास वाढण्याचे प्रमुख कारण आहे. पावसाळ्यात सुर्य किरणे पृथ्वीवर न पडल्यामुळे शरीराला विटामीन ड पुरेशा प्रमाणात मिळत नाही. तसेच वातावरणात थंडावा असल्याने थरथराट, खोकला, श्वास घेण्यास त्रास होणे यासारखे दम्याची लक्षणे आढळून येतात.

पावसाळ्यात वातावरणात दमटपणा असल्याने घर स्वच्छ व शक्य तितके कोरडे ठेवावे. घरातील कार्पेट्स, बेडशीट्स,पिलो कवर, पडद्यावरील धूळ स्वच्छ करावी. ज्या दम्याच्या रुणांना इनहिलर घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यांनी वेळोवेळी इनहिलरचा वापर करावा. दररोज श्वसनाचे व्यायाम, प्रणायम, मेडीटेशन करून दम्याच्या रुग्णांनी नेहमी स्वत:ला सकारात्मक ठेवावे. औषध, इनहिलरच्या वापरा बरोबरच दम्याचे रुग्ण नेबुलाइजरचा सुद्धा वापर करतात. नेबुलाइजर ही एक एयरोसोल-जनरेटिंग प्रकिया आहे. म्हणून याचा कोणत्याही व्यक्तीशी संपर्क होऊ न देता वापर करावा. दम्याच्या रुग्णांनी कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिति ओढावल्यास तत्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा.

## होमिओपॅथीचे लाभ

होमिओपॅथी एक समग्र विज्ञान आहे, जो रोगाचा नाश करण्याऐवजी त्याला बरा आणि उपचार करते आणि आजारी व्यक्तीची बारिक-सारिक माहिती विचारात घेते. होमिओपॅथीक औषधांच्या डोसमध्ये स्त्रोत पदार्थाची उप-शारिरीक उपस्थिती असते, परिणामी, उपायांचे कोणतेही विषारी परिणाम नाहीत. म्हणूनच मानवीय अवयवांवर कोणतेही दुष्परिणाम किंवा संरचनात्मक नुकसान होत नाहीत. तसेच औषधांमध्ये कोणतेही बाह्य रंग किंवा चव (फ्लेवर) नाहीत. होमिओपॅथीक औषधे आजारपणात शरीराची प्रतिकारशक्ती वाढवून कार्य करतात. ते मुले, गर्भवती महिला, वृद्ध व्यक्ती तसेच इम्युनो-तडजोडीच्या व्यक्तींमध्ये आणि कमकुवत शरीरयष्टि च्या लोकांचे व्यवस्थापन करण्यास सुरक्षित आहेत.

होमिओपॅथीक गोळ्या सुक्रोज आधारित आहेत (म्हणून चवीला गोड आहेत) आणि खूपच स्वादिष्ट आहेत. मुले ही औषधे स्वेच्छेने घेतात आणि औषधे घेताना तनतन करत नाहीत. गोळ्या तोंडात ठेवल्या पाहिजेत, शोषून घेतल्या पाहिजेत आणि विरघळू दिली जाते, म्हणून त्या गिळण्यासाठी पाण्याची आवश्यकता नसते. गोळ्यांचा आकार बराच लहान असल्याने औषध गिळताना कुठेही अडकत नाही.क्वचित प्रसंगी जेव्हा एखादा रुग्ण तोंडी औषधे घेऊ शकत नाही तेव्हा होमोओपॅथिक औषधे ओल्फेक्शनद्वारे (श्वासोच्छवास द्वारे) दिली जाऊ शकतात आणि ती देखील समान कार्यक्षमतेने.



होमिओपॅथी अनेक रोगांच्या आजारांना बरे करण्यास सक्षम आहे ज्यांना औषधाच्या पारंपारिक प्रणालीने असाध्य म्हणून संबोधले आहे. होमिओपॅथिक औषधांना अनुकूल प्रतिसाद देणारे अनेक आजार आढळले आहेत. एलर्जीक विकार, त्वचेचे आजार, उच्च रक्तदाब, मनोविकृती आणि मनोरुग्ण आजार यासारख्या प्रणालीगत आजार इत्यादी काही मोजके उदाहरण आहेत .ही औषधे तीव्र आणि जटिल आजारांमध्ये देखील तितकेच चांगले परिणाम देतात. होमिओपॅथिक सल्लागार म्हणून आणि २०+ वर्षांचा अनुभव असल्यामुळे होमिओपॅथीचे अविश्वसनीय परिणाम मी पाहिले आहेत. उपचार घेणार्‍या प्रत्येक व्यक्तीला हे निरामय असल्याचा सामान्य अनुभव येतो. ते त्यांच्या मनामध्ये तसेच शरीरावर चांगले जाणवते आणि याचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर सखोल प्रभाव पडतो. नियमित होमिओपॅथिक उपचार घेणार्‍या लोकांमध्ये रोग प्रतिकारशक्ती चांगली विकसित होते, ते ठराविक कालावधीत कमी आजारी पडतात आणि अशा प्रकारे निरोगी आणि सुफल जीवन जगू शकतात. म्हणूनच होमिओपॅथीला उपचारात्मक विज्ञान मानले जाते, जे रुग्णाला शारीरिक आणि सामाजिकदृष्ट्या मानसिक (भावनिक आणि बौद्धिकदृष्ट्या) चांगले करते.

**-डॉ. मोहम्मद आर. चित्तलवाला,**
होमिओपॅथिक सल्लागार,
सैफी हॉस्पिटल

लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
मंगळवार १५ ऑगस्ट २०२३


## मोबाईल हिसकावला

लातूर : लातूर येथील अंबाजोगाई रोडवरील बरूरे कॉम्पलेक्स समोरून एक व्यक्ती पायी जात असताना मोटारसायकलीवरून आलेल्या दोघा जणांनी हातातील मोबाईल हिसकावून पोबारा केला.

काल रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास फरून अब्दूल सलाम ज्युनेदी रा. युगंधर गृहनिर्माण सोसायटी हा पायी जात असताना दुचाकीवरून पाठीमागून आलेल्या दोघांनी जबरदस्तीने हातातील मोबाईल हिसकावून पळ काढला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बीड जिल्ह्यातील १४३ धरणांमधील पाणीसाठा आरक्षित; केवळ १३.३० टक्केच पाणीसाठा शिल्लक

बीड : मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात सध्या पावसाने दडी मारली असल्याने चिंताजनक परिस्थिती पाहायला मिळत आहे. जून महिना कोरडा गेला. त्यानंतर जुलै महिन्यात देखील देखील अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यातच आता ऑगस्ट महिन्यात देखील पावसाचा खंड पाहायला मिळत आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठा देखील कमी झाला असून, अनेक प्रकल्प कोरडेठाक पडली आहे. त्यामुळे प्रशासनाकडून आता उपयोजना राबवण्यासाठी हालचाली सुरु झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर, बीड जिल्ह्यातील १४३ धरणांमध्ये केवळ १३.३० टक्केच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे पुढील आदेशापर्यंत पाटबंधारे प्रकल्पातील पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करण्याचा आदेश जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी सोमवारी काढला आहे.

# तलाठी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

## लातूर जिल्ह्यात सात उपकेंद्रांवर होणार परीक्षा

लातूर : महसूल विभागांतील गट-क संवर्गातील तलाठी भरती-२०२३ अंतर्गत राज्य समन्वयक तथा अपर जमाबंदी आयुक्त, भूमी अभिलेख अतिरिक्त संचालक यांनी १७ ऑगस्ट २०२३ ते १४ सप्टेंबर २०२३ दरम्यान परीक्षा आयोजित केली आहे. यासाठी जिल्ह्यात सात उपकेंद्रांवर परीक्षा होणार असून या सर्व परीक्षा केंद्रांच्या शंभर मीटर परिसरात अपर जिल्हादंडाधिकारी विजयककुमार ढगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

लातूरमधील मौजे कोळपा येथील सांदिपनी टेक्निकल कॅम्पस, लातूर येथील स्वामी विवेकानंद इंस्टिटयूट ऑफ पॉलिटेक्निक कॅम्पस, निलंगा येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, लातूर येथील ओम साई इन्फोटेक, लातूर येथील नेटीझन्स डिजिटल झोन, लातूर येथील कॉस इंस्टिट्यूट ऑफ कॉम्प्यूटर एज्युकेशन आणि लातूर येथील गुरु ऑनलाईन परीक्षा केंद्र या सात ठिकाणी तलाठी पदासाठी परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षा केंद्रांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर परीक्षार्थी येणार असल्याने परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी सर्व परीक्षा केंद्र परिसरात १७ ऑगस्ट २०२३ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत सकाळी सात ते सायंकाळी सात या कालवधीत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू राहणार आहे.

प्रतिबंधात्मक आदेशामुळे परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश करतेवेळी पाच पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्र परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करता येणार नाही. परीक्षा केंद्राच्या शंभर मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील.

परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडुन परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासही त्यांचे परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त करण्यासाठी लातूर जिल्ह्यात विशेष मोहीम 'क्षयरोगमुक्त भारत' संकल्पनेतून उपक्रमाचे आयोजन

- पहिल्या टप्प्यात ५० ग्रामपंचायती होणार क्षयरोगमुक्त
- उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींचा होणार सन्मान

लातूर : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'क्षयरोगमुक्त भारत' या संकल्पनेतून २०२५ पर्यंत देशाला क्षयरोगमुक्त करण्यासाठी युद्धस्तरावर प्रयत्न सुरु आहेत. याचाच एक भाग म्हणून ग्रामपंचायत स्तरावरही विशेष प्रयत्न केले जात आहेत. लातूर जिल्ह्यातील ५० ग्रामपंचायती पहिल्या क्षयरोगमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीचा २४ मार्च २०२४ रोजी विशेष सन्मान करण्यात येणार असल्याचे जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे यांनी कळविले आहे.

जिल्ह्यात 'क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत' या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्यात ५० ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली आहे. या ग्रामपंचायतींनी एक हजार लोकसंख्येमध्ये वर्षभरात किमान ३४ संशयित व्यक्तीची क्षयरोग तपासणी होणे अपेक्षित आहे.

### उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीचा २४ मार्चला होणार सन्मान

क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत उपक्रमात उत्कृष्ट कार्य करून क्षयरोगमुक्त होणाऱ्या ग्रामपंचायतींना २४ मार्च, २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पारितोषिक देवून सन्मानित केले जाणार आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायतींनी पूर्वतयारी सुरु केली आहे.

### तीन हजार २५० क्षयरुग्ण नोंदणीचे उद्दिष्ट

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात एक हजार ७५० सार्वजनिक आणि एक हजार ५०० खासगी अशा एकून ३ हजार २५० क्षयरुग्ण नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत सार्वजनिक स्वरूपातील मध्ये ८४० आणि खासगी क्षेत्रात ८८८ अशा एकुण एक हजार ७२८ क्षयरुग्णांची नोंदणी झालेली आहे.

'क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत' या उपक्रमाची जिल्ह्यात अंमलबाजवणी सुरु झाली आहे. पंचायतराज संस्थाना सक्षम करणे, हा त्यामागील उद्देश आहे. क्षयरोगाशी निगडीत समस्यांचे निराकरण करणे व क्षयरोग दूर करण्यासाठी ग्रामपंचायतींमध्ये स्पर्धा निर्माण करणे, त्यासाठी त्यांना पारितोषिक देवून जाहीर सन्मान केला जाणार आहे.

### प्रधानमंत्री 'क्षयरोगमुक्त भारत अभियान' अंतर्गत अतिरिक्त पोषण आहार किटसाठी आवाहन

उपचाराधिन असणाऱ्या सर्व क्षयरूग्णांचे उपचार यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी रुग्णांना अतिरीक्त मदत करण्याची गरज आहे. यासाठी क्षयरूग्णांना 'प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियान'च्या माध्यमातून जिल्ह्यात असणाऱ्या सर्व क्षयरूग्णांना स्वंयसेवी संस्था, सामाजिक संस्था, दानशुर व्यक्ती यांच्या सहभागाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या राष्ट्रीय धोरणात्मक योजनेअंतर्गत - २०२५ पर्यंत क्षयरोगमुक्त भारत उद्दिष्ट पुर्तीसाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्षयरोग कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

### 'क्षयरोग राजदूत' संकल्पना राबविणार

विद्यार्थी, शिक्षक यांनी आपल्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या शाळेमार्फत क्षयरोग राजदूत बनावे व विद्यार्थी, शिक्षक यांच्यामार्फत क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यात यावी. तसेच इतर क्षेत्रामधील कार्यरत नामांकित व्यक्तींनीही क्षयरोग राजदूत म्हणून पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकार डॉ. तांबारे यांनी केले आहे.

# परिवारवादामुळे विकासाला ब्रेक- नरेंद्र मोदी

नवी दिल्ली: देशभरात आज ७७ वा स्वातंत्र्यदिन साजरा होत आहे. दिल्लीतील लाल किल्ल्यावर पंतप्रधान मोदींच्या (झच् चेवळ डशिशलह) हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. लाल किल्यावर ध्वजारोहण पार पडल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी ८८ मिनिटे देशाला संबोधित केलं. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. तसंच देशातील युवकांना संदेशही दिला. तसेच पुढील वर्षी पुन्हा लाल किल्ल्यावरून भाषण करणार असा विश्र्वास मोदींनी व्यक्त केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, पुढील वर्षी या लाल किल्ल्यावरून मी तुमच्यासमोर देशाचे यश मांडणार आहे. मी तुमच्यातून आलोय,तुमच्यसाठी जगतोय. मी स्वप्न देखील तुमच्यासाठी पाहतोय. मी कष्ट करतोय ते देखील तुमच्यासाठी करत आहे. तुम्ही मला ही जबाबदारी दिली म्हणून मी हे करत नाही तर हा देश माझे कुटुंब आहे. त्यामुळे माझ्या कुटुंबातील सदस्यांना दुःख झालेले मी पाहू शकत नाही.

भ्रष्टाचाराच्या विरोधात अखंड लढणार आहे. देशातून परिवारवाद उखडून लावणार आहे. लोकशाहीत परिवारवादी पक्ष ही विकृती आहे. परिवारवादामुळे विकासाला ब्रेक लागला आहे. लांगुलचालनाच्या विरोधात लढा राहणार आहे.

## जाहीर प्रगटन

या प्रगटनाद्वारे जाहीर करण्यात येते की, माझ्या शालेय व इतर काही कागदपत्रांमध्ये माझे नाव नजरचुकीने **DESHMUKH AZIJMIYA SALIMMIYA** असे लिहले गेले आहे. परंतू माझे बरोबर नाव **DESHMUKH AZIJMIYA SALIM** हे आहे. व मी यापुढे भविष्यात ही माझे बरोबर नाव **DESHMUKH AZIJMIYA SALIM** हेच वापरणार आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

जुने नाव : **DESHMUKH AZIJMIYA SALIMMIYA**
नवीन नाव : **DESHMUKH AZIJMIYA SALIM**
पत्ता : बालाजी नगर, लातूर - ४१३५१२

प्रगटक
**DESHMUKH AZIJMIYA SALIM**

## Change of Name

To whomever it may concern, this is to declare that, in my educational and some other documents by mistake my name was written as **DESHMUKH AZIJMIYA SALIMMIYA** But my correct name is **DESHMUKH AZIJMIYA SALIM** and from now onwards I will use my correct name **DESHMUKH AZIJMIYA SALIM.** Hence declared kindly take a note.

**Old Name : DESHMUKH AZIJMIYA SALIMMIYA**
**New Name : DESHMUKH AZIJMIYA SALIM**
**Address : BALAJI NAGAR, LATUR - 413512**

**Deponent**
**DESHMUKH AZIJMIYA SALIM**

## CHANGE OF NAME

I have change my name from **SHAIKH NAZMIN RAUF TO SHAIKH NAJMIN RAUF** Hence for this declaration in future I will be use this name **SHAIKH NAJMIN RAUF** in future the same name will be used by my Husband & Children and all family.

**Old Name :- SHAIKH NAZMIN RAUF**
**New Name :- SHAIKH NAJMIN RAUF**
**Address :-** CHAND TARA MAJID KE BAJUME, CHAND NAGAR, LATUR-413512


SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

## इंदिरा महिला नागरी सहकारी बँक लि. लातूर

### अधिमंडळ वार्षीक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांसाठी)

इंदिरा महिला नागरी सहकारी बँक लि. लातूर बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची २७ वी वार्षीक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. २९/०८/२०२३ रोजी दुपारी ठीक ४.३० वाजता गांधी मैदान येथील बँकेच्या कार्यालयात लातूर येथे बँकेच्या सभागृहात खालील विषयावर विचार विनीमय करण्यासाठी बँकेच्या अध्यक्षा ॲड. सविता ओमप्रकाश मोतीपवळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केले आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

०१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
०२. दि. ३१.०३.२०२३ अखेर संपणाऱ्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.
०३. सन २०२३-२४ सालासाठी तयार केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.
०४. सन २०२२-२३ वर्षातील अंदाज पत्रकापेक्षा कमी/अधिक झालेल्या खर्चास व सन २०२३-२४ या वर्षाचे अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
०५. बँकेचे सन २०२२-२३ चे वैधानिक लेखा परिक्षणाचा अहवाल वाचून नोंद घेवून दोषदुरूस्ती अहवालास मान्यता देणे.
०६. समवर्ती लेखा परिक्षक व आयकर लेखा परिक्षकाची नियुक्ती करणे व वेतन ठरविणेस मान्यता देणे.
०७. बँकेच्या नविन शाखा उघडण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.
०८. बँकेचे कार्यक्षेत्र वाढीबाबत चर्चा करून निर्णय घेणे.
०९. बँकेच्या उपविधीमध्ये नियमानुसार विविध बदल करणे बाबत चर्चा करून निर्णय घेणे.
१०. अधिकृत भाग भांडवलात वाढ करणे.
११. लॉस असेंट कर्ज राईट ऑफ करणे बाबत.
१२. मा. अध्यक्षाच्या परवानगीने आयत्यावेळेच्या विषयावर चर्चा करणे.

**स्थळः बँकेच्या सभागृहात, गांधी मैदान शॉपींग कॉम्प्लेक्स वरचा मजला, लातूर**
**दि. १५/०८/२०२३**

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**श्री. अविनाश सुभाष करकोळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

सुचना :-
०१. गणपुर्तीच्या कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा ठरलेल्या ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेस गणपुर्ती कोरमची आवश्यकता राहणार नाही. ०२. बँकेच्या कामाबाबत सभासदांना काही प्रश्न विचारावयाची असल्यास ते लेखी दि. २३/०८/२०२३ पर्यंत बँकेस मिळणे आवश्यक आहे. त्या तारखेनंतर आलेल्या प्रश्नांवर विचार केला जाणार नाही. ०३. सभासदांनी सभेस येताना आपल्या अहवालाची प्रत सोबत आणावी.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९

